भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
पर्यावरण विभाग

**प्रसिध्दीसाठी**

ध्वनी प्रदुषण नियम २००० व रस्त्यावर /पदपथावर /पादचारी मार्गाव तातपुरत्या स्वरुपात मंडप व तस्तम रचना उभारण्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय मुंब येथे जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० डॉ.महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन दाख करण्यांत आलेली आहे. त्यानुसार प्राप्त परिपत्रकान्वये मा.उच्च न्यायालय यांच्या आदेशाप्रमा उक्त परिपत्रक वृत्तपत्रात व महानगरपालिका संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

भिवंडी निजामूपर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात गोपाळकाला (दहीहंडी) गणपती व नवरात्रौ उत्सव, रमझान महिना,बकरी ईद, मोहरम, नाताळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व इतर सर्व धर्मीय उत्सव, सण रस्त्यावर साजरे केले जातात. या उत्सव/सण दरम्यान ध्वनी क्षेपक लावून मोठया प्रमाणांत मंडप उभारण्यासाठी विविध संस्था महानगरपालिकेकडे अर्ज करीत असतात किंवा बऱ्याचदा विनापरवाना ध्वनी क्षेपकाचा वापर करुन मंडप उभारले गेल्याने मा.न्यायालयाचा अवमान होवून त्यास मनपा प्रशासनास जबाबदार धरल्याने परवानगी धारकांवर कटू कारवाईचा प्रसंग उपस्थित होत आहे.

मा.न्यायालयाचे निर्देशाचे पुर्णतः अनुपालन व्हावे याकरीता मंडप/ध्वनी क्षेपकाच्या परवानगी पहाणी करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी सो., ठाणे यांनी महसुल विभागाकडील तहसिलदार, भिवंडी यांचे अधिनस्त अधिकाऱ्यांची पथके गठीत करण्यांत येऊन त्यांचे मार्फत महानगरपालिका हद्दीतील मंडप /ध्वनी क्षेपकाच्या परवानगीची पाहणी करण्यांत येत असून, याबाबत सबंधीत सहा.आयुक्त प्र.स.क्र.१ ते ५ यांनी सबंधीत प्राधिकरण तथा कार्यालयाशी संपर्क साधून उत्सव/सण दरम्यानच्या काळात समन्वयाने आवश्यक कार्यवाहीस अंमल देण्यांत यावा.

तरी, आगामी कालावधीत विविध उत्सव/सण येणार असून,प्रभाग कार्यक्षेत्रात यापूर्वी निर्गमित केलेले आदेश व प्रचलित मार्गदर्शक तत्वानुसार आखलेल्या धोरणाप्रमाणे आपले अधिकार तथा कार्यक्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करुन कार्यवाही करण्याची तजबीज ठेवण्यांत आलेली आहे.

नियंत्रण अधिकारी तथा
शहर अभियंता (प्र.)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका